MHAU030008312021

दाखल दिनांक : १३.०१.२०२१
नोंदणी दिनांक : १३.०१.२०२१
निकाल दिनांक : १३.०३.२०२६
कालावधी : ०५ वर्षे, ०२महिने, ००दिवस

**(भाग–अ)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद (न्यायालय क्र.१३) यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी स्नेहल एस. जाधव)**

**नियमित फौजदारी खटला क्र.२६४/२०२१**
**निशाणी २१**

**फिर्यादी** महाराष्ट्र शासन
तर्फे एम.आय.डी.सी. वाळुज पोलिस स्टेशन,
तालुका व जिल्हा औरंगाबाद.
**फिर्यादीतर्फे** सहाय्यक सरकारी वकील श्री.एस.बी.भोसले

**विरुध्द**

**आरोपी**
१. दत्तात्रय सुभाष खोमणे,
वयः ३२ वर्षे, व्यवसायः शेती,
२. सुभाष हरीभाउ खोमणे,
वयः ६० वर्षे, व्यवसायः शेती,
३. इंदुबाई सुभाष खोमणे,
वयः ५५ वर्षे, व्यवसायः शेती,
४. मंगेश अशोक चोरगे,
वयः २२ वर्षे, व्यवसायः शेती,
सर्व रा. तुळजाई कॉलनी क्र. २ संचेती शाळेजवळ आनंदबाग टायगर जिम शेजारी थेरगाव डांगेचौक परिसर पिंपरी चिंचवड पुणे.

**आरोपींतर्फे** विधिज्ञ श्री. आर. पी. मातकर

**(भाग–ब)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि. २६.०४.२०१२ पासुन |
| फिर्याद दिल्याची तारीख | २३.०१.२०२० |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १७.११.२०२० |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३.०३.२०२६ |
| आरोपीला शिक्षा ठोठावली असेल तर त्याची तारीख | निरंक |

**(आरोपींचे तपशील)**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | आरोपीवर दोषारोप | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा लादलेली असल्यास | शिक्षा वजावट केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दत्तात्रय सुभाष खोमणे | फौ.प्र.सं. कलम ४१(१) अन्वये नोटीस दिली | -- | भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | आरोपींची निर्दोष मुक्तता. | निरंक | निरंक |
| २. | सुभाष हरीभाउ खोमणे | | | | | | |
| ३. | इंदुबाई सुभाष खोमणे | | | | | | |
| ४. | मंगेश अशोक चोरगे | | | | | | |

**(भाग-क)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी -**

| साक्षीदाराचा अ.क्र. | पुराव्याचा तपशील व निशाणी | साक्षीदाराचे नाव |
|---|---|---|
| १. | फिर्यादी, निशाणी पी१/पीडब्ल्यू१ | दिपाली दत्तात्रय खोमणे |

**आरोपीतर्फे साक्षीदारांची यादी -**

| साक्षीदाराचा अ.क्र. | पुराव्याचा तपशील व निशाणी | साक्षीदाराचे नाव |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षातर्फे दाखल पुरावा –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | सहीपुरती पी–१ | फिर्याद |

**आरोपीतर्फे दाखल पुरावा –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**मुद्देमाल –**

| अ.क्र. | मुद्देमालाचे वर्णन | मुद्देमाल क्रमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक १३.०३.२०२६)

प्रस्तुत आरोपी यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ, ३२३, ५०४ , ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा तोहमत आहे.

**फिर्यादी पक्षाची कथने थोडक्यात खालीलप्रमाणे–**

२. दि.२६.०४.२०१२ रोजी फिर्यादीचे लग्न आरोपी क्र.१ याचे सोबत हिंदु रितीरिवाजाप्रमाणे झाले होते. लग्नानंतर आरोपीने फिर्यादीला सहा महिने चांगले वागवले नंतर तिन महिन्यात तिला दिवस गेले असता तिचे पोटातील बाळ आमचे नाही असे म्हणून तिचे वर संशय घेवुन तिला सदरचा गर्भ पाडण्याबाबत सांगीतले. फिर्यादीने गर्भ पाडला नाही व तिच्या वडीलानी चारचाकी कार घेवून दिली नाही. म्हणुन आरोपींनी

संगनमत करुन छोटया–छोट्या कारणावरुन फिर्यादीस घरात कोंडुन वारंवार शिवीगाळ व हाताचापटाने मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला फिर्यादीचे आई वडील त्यांना समजावण्यासाठी गेले असता त्यांना ही शिवीगाळ केली व दि २/१०/१९ रोजी घरातुन फिर्यादीस तिचे दोन मुलासह घराबाहेर हाकलून दिले. फिर्यादी तिचे वडीलांचे घरी आल्यावर ही तिला तुझे सिझर झाले तर मी तुला वागवणार नाही असे म्हणून तिचे पतीने धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने सदरची फिर्याद दिली.

३. प्रथम खबरी अहवालानुसार एम.आय.डी.सी. वाळुज पोलिस ठाणे, औरंगाबाद येथे आरोपी यांचे विरुध्द गु.र.क्र.४२/२०२० हा भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. जी.डी.खंडागळे यांनी गुन्हयाचा तपास करुन, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवून, आवश्यक कागदपत्रे गोळा करुन आरोपींचे विरुध्द योग्य पुरावा मिळाल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ नुसार आरोपींचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ गुन्हयाकरिता अंतिम अहवाल सादर केला.

४. आरोपी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप (निशाणी १२) ठेवण्यात आला. आरोपी क्र. १ ते ४ यांनी त्यांना गुन्हा कबूल नसल्याचे कथन केले. फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यामध्ये आरोपींचे विरुद्ध गुन्हा दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. फिर्यादी पक्षातर्फे सरकारी वकिल श्री. एस.बी. भोसले व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. आर. पी. मातकर यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन केले असता, व आरोपींचे विरुध्द तोहमत असणा–या

गुन्हयाचे स्वरुप पाहता खालील प्रमाणे वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व त्याबाबतची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे शाबीत करतो का की, लग्न झाल्यानंतर सहा महीन्यापासुन ते आजपावेतो आरोपी यांचे राहते घरी आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादीला चारचाकी गाडी घेण्यासाठी पैशांची मागणी करुन त्याकरीता शिवीगाळ करून मारहाण करुन फिर्यादी हिचा वेळोवेळी मानसिक व शारीरिक छळ केला व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्ष हे शाबीत करतो का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादीला मारहाण करुन तिला इच्छापुर्वक दुखापत पोहचविली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्ष हे शाबीत करतो का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमताने मानहानीकारण शब्दात फिर्यादीचा वेळोवेळी अपमान करुन फिर्यादी ही सार्वजनिक शांततेचा भंग करेल किंवा एखादा गुन्हा करेल अशा प्रकारे फिर्यादीला चिथावणी दिली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्ष हे शाबीत करतो का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी संमगनमताने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी | |

| | | |
|---|---|---|
| | देऊन फौजदारी पात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ५. | अंतिम आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र. १ ते ५ बाबत –**

६. वादप्रश्न क्र. १ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता वादप्रश्न क्र. १ ते ५ हे एकत्रीतरित्या चर्चेकरीता घेतलेले आहेत.

७. अभियोगपक्षाच्या कथनानुसार सबब, दि. सप्टेंबर २०१२ पासुन ते फिर्याद दाखल करे पर्यंत आरोपी यांचे राहते घरी आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमताने फिर्यादीला चारचाकी वाहनासाठी पैशांची मागणी करुन व चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करून मारहाण करुन फिर्यादी हिचा वेळोवेळी मानसिक व शारीरिक छळ केला. अभियोगपक्षाच्या कथनांचा विचार करता, भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ मधील तरतुदी पाहणे गरजेचे आहे.

**भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ** – एखादया स्त्रीच्या पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी तिला क्रुर वागणुक देणे–

जो कोणी एखादया स्त्रीचा पती असुन, किंवा पतीचा नातेवाईक असुन, अशा स्त्रीला क्रुर वागणुक देईल त्याला, तीन वर्षेपर्यंत असु शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

**स्पष्टीकरण** – या कलमाच्या प्रयोजनार्थ "क्रुर वागणुक देणे” याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे –

(अ) ज्यामुळे त्या स्त्रीला आत्महत्या करणे क्रमप्राप्त होईल अथवा तिला दुखापत होईल अथवा तिच्या जिवीताला, अंगाला किंवा स्वास्थाला (मानसिक किंवा शारीरिक) धोका निर्माण होईल अशा तऱ्हेचे कोणतेही बुिद्धीपुरःसर वर्तन; किंवा

(ब) जेव्हा त्या स्त्रीवर किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या कोणत्या व्यक्तीवर कोणत्याही मालमत्तेची किंवा मूल्यवान रोख्याची बेकायदेशीर मागणी पुर्ण करण्याची जबरदस्ती करण्याच्या हेतुने अथवा अशी मागणी पुर्ण करण्यात तिच्याकडून किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीकडुन कसुर झाल्याबद्दल तिला सतावले जाते तेव्हा, अशी सतावणुक.

८. आरोपी क्र. १ ते ४ यांनी चारचाकी वाहनासाठी पैशांची बेकायदेशीरपणे मागणी पूर्ण करणेबाबत फिर्यादीचा छळ केला असे अभियोग पक्षाचे कथन आहे. सबब आरोपी यांनी फिर्यादीकडे पैशांची मागणी करुन तिला शारीरीक व मानसिक त्रास दिला ही बाब अभियोग पक्षाला शाबीत करणे गरजेचे आहे.

९. अभियोग पक्षाने त्यांचे कथनांच्या सत्यतेकरीता फिर्यादी (साक्षीदार क्र. १/निशाणी पी१/डब्ल्यू१) हिला तपासले. सदर साक्षीदाराने तिचे सरतपासामध्ये असे कथन केले की, दिनांक २६.०४.२०१२ रोजी तिचे व आरोपी क्र. १ चे लग्न झाले. त्यानंतर आरोपींनी तिच्यावर संशय घेऊन गर्भपात केला तसेच शरीरसंबधासाठी त्रास दिला हे कथन नाकारले आहे. फिर्यादीने तिच्या फिर्यादीमधील मजकुर नाकारला आहे. परंतु सही असल्याचे मान्य केले आहे.

१०. फिर्यादी ही अभियोग पक्षाच्या कथनांना सहाय्य करीत नसल्याने सरकारी वकील यांनी सदर फिर्यादीला भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी घेतली. सदर साक्षीदाराचे व आरोपीचे न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले आहे.

११. वर कथन केल्याप्रमाणे स्वतः फिर्यादी ही आरोपी यांनी तिला पैशांची मागणी करुन मारहाण व शिवीगाळ केली ही बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ मधील तरतुदींचा विचार करीता आरोपी यांनी फिर्यादीला पैशांची मागणी करुन त्याबाबत तिचा शारिरीक अथवा मानसिक छळ केला ही बाब

अभियोग पक्षाला शाबीत करणे गरजेचे होते. परंतु फिर्यादी ही अभियोग पक्षाच्या कथनांना सहाय्य करीत नाही असे दिसुन येते. तसेच अभियोग पक्षाने त्यांचे कथनांचे सत्यतेकरीता अन्य कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे स्वतः फिर्यादी ही तिचे तोंडी पुराव्यात आरोपी यांनी तिच्याकडे पैशांची मागणी करुन तिला शारीरीक व मानसिक छळ केला ही बाब नाकारत असल्याने आरोपी यांनी भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ अन्वये गुन्हा केला ही बाब योग्य पुराव्यांच्या अभावी शाबीत होऊ शकलेली नाही.

१२. वर कथन केल्याप्रमाणे आरोपी यांनी फिर्यादीला चारचाकी वाहन घेण्यासाठी मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीने नाकारलेले आहे. अभियोगपक्षाने सदर बाब शाबीत करण्याकरीता अन्य कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच फिर्यादीच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादी व आरोपी यांच्या मधील वाद हा कौटुंबिक स्वरुपाचा दिसुन येत असुन सदरचा वाद हा न्यायालयाबाहेर मिटला असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे योग्य पुराव्यांच्या अभावी आरोपी यांनी फिर्यादीला मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केली ही बाब शाबीत होऊ शकलेली नाही. सबब वर नोंदवलेल्या निरिक्षणांवरुन व निष्कर्षांवरुन वादप्रश्न क्र. १ ते ४ बाबत मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे. तसेच वादप्रश्न क्रमांक ५ बाबत मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ ते ४ यांना भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या दोषातून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र. १ ते ४ यांचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपी क्र. १ ते ४ यांना असे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकामी न्यायालयास सहा महिन्यांच्या कालावधीकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामिन सादर करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात वाचून घोषित.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SNEHAL SHANKAR JADHAV
Date: 2026.03.13 12:27:20 +0530

**दिनांक – १३.०३.२०२६**
**ठिकाण – औरंगाबाद**

**(स्नेहल एस. जाधव)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र. १३), औरंगाबाद.**